महाराष्ट्र राज्य सहकारी वस्त्रोद्योग महासंघ मर्या., मुंबई यांना सन २०१९-२० या आर्थिक वर्षा करीता अनुदान स्वरुपात अर्थसहाय्य मंजूर करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांक :- महासंघ- २०१९/ प्र.क्र.५४/ टेक्स-१ (ब)
तिसरा मजला (विस्तार इमारत), मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २७ ऑगस्ट, २०१९

वाचा :- १. शासन निर्णय, सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र.सूतगि-२००८/प्र.क्र.१७५/ टेक्स- १(ब), दिनांक २२ जून, २०१०.
२. शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. संकीर्ण-२०१६/प्र.क्र.३१/कोषा-प्रशा ५, दिनांक १० मे, २०१६.
३. वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्र. अर्थसं- २०१९/ प्र.क्र.९२/अर्थ- ३, दिनांक ८ जुलै, २०१९.
४. महाराष्ट्र राज्य सहकारी वस्त्रोद्योग महासंघ मर्या., मुंबई यांचे पत्र क्र. एडिएम/लेखा/ अनुदान/ २०१९-२०/५५, दिनांक ६ मे, २०१९.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र राज्य सहकारी वस्त्रोद्योग महासंघ मर्यादित, मुंबई ही वस्त्रोद्योगातील सहकारी संस्थांची प्रतिनिधी संस्था आहे. वस्त्रोद्योग महासंघाची नोंदणी महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतुदीनुसार दिनांक २२.१२.१९७० रोजी झालेली आहे. राज्यातील सहकारी सूतगिरण्यांबरोबरच वस्त्रोद्योगातील इतर सहकारी संस्थांना आर्थिक व तांत्रिक मार्गदर्शन करणे तसेच वस्त्रोद्योग संचालनालय व राज्य शासन, वस्त्रोद्योगातील सहकारी संस्था यांच्यामधील दुवा म्हणून काम करणे हे संस्थेचे मुख्य उद्दिष्ट आहे. संदर्भाधीन दिनांक २२ जून, २०१० च्या शासन निर्णयानुसार महाराष्ट्र राज्य सहकारी वस्त्रोद्योग महासंघ मर्यादित, मुंबई या संस्थेस सन २००९-१० पासून कायमस्वरुपी सरसकट प्रतिवर्षी रु. ५०.०० लाख इतके अर्थसहाय्य अनुदान स्वरुपात मंजूर करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्याअनुषंगाने महासंघास सन २०१९-२० या आर्थिक वर्षात अनुदान मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक : अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दिनांक ८ जुलै, २०१९ अन्वये सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील मंजूर तरतुदीच्या ६०% मर्यादेत अनिवार्य व कार्यक्रमावरील खर्चाचा अर्थसंकल्पित निधी खर्च करण्यास परवानगी देण्यात आली आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्य सहकारी वस्त्रोद्योग महासंघ मर्यादित, मुंबई या संस्थेस “मागणी क्रमांक व्ही- २ अंतर्गत, २४२५ - सहकार

(००) १०८, इतर सहकारी संस्थांना सहाय्य (०४) , सहकारी सूत कताई गिरण्या, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना - राज्य योजनांतर्गत योजना, (०४) (०१), महाराष्ट्र राज्य सहकारी सूतगिरणी महासंघ मर्यादित, मुंबई या संस्थेस व्यवस्थापकीय अर्थसहाय्य (अनिवार्य) (२४२५ ०५९५) ३३- अर्थसहाय्य" या लेखाशिर्षाखाली संस्थेतील कर्मचा-यांच्या वेतनावरील खर्च भागविण्यासाठी सन २०१९-२० मध्ये अर्थसंकल्पित असलेल्या रु. ५०.०० लाख इतक्या निधीच्या ६०% रक्कम म्हणजे रु. ३०,००,०००/- (रुपये तीस लाख फक्त) मंजूर करण्यास शासन मान्यता देत आहे.

२. शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दिनांक ८ जुलै, २०१९ अन्वये "३३-अर्थसहाय्य" या बाबीखालील खर्च करण्यास विभागास अधिकार प्राप्त झाले असून सदर परिपत्रकातील परिच्छेद- ७ ते १३ तसेच १५ व १६ या प्रकरणी लागू नाहीत. परिच्छेद - १४ या प्रकरणी लागू असून वेतन तसेच प्रशासकीय खरेदीविषयक धनादेश लाभार्थ्यांच्या अकाऊंटमध्ये ECS द्वारे प्रदान करण्यात येते.

३. वित्त विभाग, परिपत्रक, दि. ८ जुलै, २०१९ मधील परिशिष्टातील अ.क्र.९ मधील "३३) अर्थसहाय्य" या बाबीसंदर्भातील तपासणी सूची खालीलप्रमाणे असून त्याबाबतचे विभागाचे अभिप्राय खाली नमूद करण्यात आलेले आहेत.

१) योजनेस प्रशासकीय मान्यता :- शासन निर्णय क्र.सूतगि २००८/प्र.क्र.१७५/टेक्स-१(ब), दिनांक २२ जून, २०१० अन्वये महाराष्ट्र राज्य सहकारी वस्त्रोद्योग महासंघ मर्या., मुंबई यांना सन २००९-२०१० पासून कायमस्वरुपी सरसकट प्रतिवर्षी रु.५०.०० लाख इतके अर्थसहाय्य अनुदान स्वरुपात मंजूर करण्यास नियोजन व वित्त विभागाच्या सहमतीने शासन मान्यता दिली आहे.

२) निधी वितरण शासन निर्णयातील अटी व शर्तींची पूर्तता झाल्यानंतरच होणार आहे- शासन निर्णय क्र. सूतगि २००८/प्र.क्र.१७५/टेक्स-१(ब), दिनांक २२ जून, २०१० अन्वये महाराष्ट्र राज्य सहकारी वस्त्रोद्योग महासंघ मर्या., मुंबई यांना सन २००९-२०१० पासून कायमस्वरुपी सरसकट प्रतिवर्षी रु.५०.०० लाख इतके अर्थसहाय्य अनुदान स्वरुपात मंजूर करण्यात येते. सन २०१८-१९ मध्ये वस्त्रोद्योग महासंघास एकूण रु. ४५.०० लाख इतके अर्थसहाय्य वितरीत करण्यात आले आहे. सदर रकमेच्या विनियोगाबबातचे प्रमाणपत्र सनदी लेखापाल यांनी सादर केले आहे.

३) यापूर्वी वितरीत केलेल्या ७५% निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र- सन २०१८-१९ मध्ये वस्त्रोद्योग महासंघास दिनांक ४ सप्टेंबर, २०१८ व दिनांक २२ फेब्रुवारी, २०१९ च्या शासन निर्णयांन्वये रु.४५.०० लाख इतकी रक्कम मंजूर करण्यात आली असून सदर संपूर्ण रक्कम वस्त्रोद्योग महासंघाने कर्मचा-यांच्या वेतनावर खर्च झाली असल्याबाबतचे विनियोग प्रमाणपत्र सादर केले आहे.

४) **यापूर्वी वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने लेखापरीक्षक / महालेखापाल यांच्याकडून कोणतेही गंभीर आक्षेप नाहीत** :- महासंघाचे सन २०१७-१८ अखरचे शासकीय लेखापरिक्षण झालेले असून लेखापरीक्षणास सतत “अ” वर्ग प्राप्त होत आहे. सन २०१८-१९ चे शासकीय लेखापरिक्षण करण्याबाबत विशेष लेखापरिक्षक, सहकारी संस्था, मुंबई यांना कळविण्यात आले आहे.

५) **निधी लाभार्थ्यांच्या थेट खात्यात जमा होणार आहे** - सदर अर्थसहाय्याची रक्कम महाराष्ट्र राज्य सहकारी वस्त्रोद्योग महासंघ मर्यादित, मुंबई यांचे दि सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि., बॅलार्ड इस्टेट शाखा, मुंबई- खाते क्रमांक. ०२३२००१००००६२२३ मध्ये जमा करण्यात येणार आहे.

६) वस्तु खरेदी करण्यापूर्वी खरेदी केलेल्या अशा वस्तुंची नोंद Dead Stock रजिस्टर मध्ये घेण्यात आली असून त्याचा योग्य वापर झाला असून त्या पडून नाहीत, असे प्रमाणपत्र-
यासंदर्भात महासंघाकडून प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे.

७) **यामधून खरेदी होणार असल्यास प्रत्यक्ष वस्तु प्राप्त झाल्यानंतरच संबंधितांना देयक अदा केले जाणार आहे** - याबाबतचे हमीपत्र महासंघाने सादर केले आहे.

८) आवश्यक त्या ठिकाणी आदिवासी/सामाजिक न्याय विभाग यांची निधी वितरणास सहमती आहे- लागू नाही.

९) **प्रस्तुत योजनेत कोणतेही संक्षिप्त देयक प्रलंबित नाही** - सदर योजनेखाली कोणतेही संक्षिप्त देयक प्रलंबित नाही.

१०) निधी स्वीय प्रपंची लेखा अथवा बँक खात्यात जमा न करता खर्च केला जाणार आहे - लागू नाही.

४. शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. संकीर्ण-२०१६/प्र.क्र.३१/कोषा-प्रशा ५, दिनांक १० मे, २०१६ मधील परिच्छेद ब) - ३) मधील तरतुदीनुसार, शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/ अर्थ-३, दिनांक ८ जुलै, २०१९ सोबतच्या परिशिष्टातील अ.क्र. ३ बाबत नमूद करण्यात येते की, सदर योजनेखालील खर्च हा अनिवार्य खर्च असून याच्या स्वरुपात किंवा व्याप्तीमध्ये बदल होत नसल्यामुळे वित्त विभागाच्या सहमतीची आवश्यकता नाही.

५. शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. संकीर्ण २०१६/प्र.क्र.३१/कोषा-प्रशा ५, दिनांक १० मे, २०१६ मधील परिच्छेद ब) ३) मधील तरतुदीनुसार, शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/ अर्थ-३, दिनांक ८ जुलै, २०१९ च्या परिशिष्टातील अ.क्र. ९ मधील तपासणी सुचीतील या प्रकरणी लागू असलेल्या मुद्यांची पूर्तता होत आहे.

६. शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. संकीर्ण २०१६/प्र.क्र.३१/कोषा-प्रशा ५, दिनांक १० मे, २०१६ मधील परिच्छेद अ) नुसार या प्रकरणी माहिती खालीलप्रमाणे आहे :-

१) **विभागास प्रदान वित्तीय अधिकार** :- शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अर्थसं-२०१९/ प्र.क्र.९२/अर्थ-३, दिनांक ८ जुलै, २०१९ अन्वये "३३-अर्थसहाय्य" या बाबीखालील खर्च करण्यास विभागास अधिकार प्राप्त झाले असून सदर परिपत्रकातील तपासणी सूचीप्रमाणे सर्व बाबींची सदर प्रकरणी पूर्तता होत आहे.

२) **मंजूर निधी** :- मागणी क्रमांक "व्ही - २ अंतर्गत २४२५ - सहकार, (००) १०८, इतर सहकारी संस्थांना सहाय्य (०४) सहकारी सूत कताई गिरण्या, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना - राज्य योजनांतर्गत योजना - (०४) (०१) महाराष्ट्र राज्य सहकारी सूत गिरणी महासंघ मर्यादित, मुंबई या संस्थेस व्यवस्थापकीय अर्थसहाय्य (२४२५ ०५९५) ३३, अर्थसहाय्य" या लेखाशिर्षाखाली सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षासाठी रु. ५०.०० लाख इतका निधी अर्थसंकल्पित असून डिसेंबर, २०१ अखेरपर्यंत ६०% म्हणजे रु.३०.०० लाख इतका निधी खर्च करण्यास परवानगी आहे. या लेखाशीर्षाखालील संपूर्ण निधी अद्याप अखर्चित आहे.

३) **मागील ३ महिन्यांपूर्वी दिलेल्या अनुदानापैकी ७५% किंवा अधिक निधी खर्च झाला आहे** :- सन २०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये महाराष्ट्र राज्य सहकारी सूत गिरणी महासंघ मर्यादित, मुंबई या संस्थेस अनुदान म्हणून एकूण रु. ४५.०० लाख इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. हा संपूर्ण निधी वस्त्रोद्योग महासंघातील कर्मचा-यांच्या वेतनावर खर्च झाला असल्याबाबतचे विनियोग प्रमाणपत्र सादर करण्यात आले आहे.

४) **ज्या लेखाशीर्षाखाली अनुदान वितरीत करण्यांत येत आहे त्या लेखाशीर्षांतर्गत १ वर्षापूर्वीचे संक्षिप्त देयक प्रलंबित नाही** :- या योजनेखाली १ वर्ष जुने संक्षिप्त देयक प्रलंबित नाही.

५) स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदान देतांना त्यांचेकडून राज्य शासनास येणे नाही किंवा येणे रक्कम समायोजित करण्यांत आली आहे :- लागू नाही.

६) **वैयक्तिक लाभार्थीचे देयक सादर करतांना यादीसह व शक्यतो आधार क्रमांकासह सादर करावे** :- लागू नाही.

७) **बांधकाम विषयक प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देतांना सक्षम अधिकाऱ्याची मान्यता घेतल्याचा उल्लेख आदेशात असावा** :- लागू नाही.

८) **खरेदी विषयक प्रक्रिया अद्ययावत उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४, दिनांक १ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयानुसार करावी व तसा**

उल्लेख प्रशासकीय मान्यतेत असावा :- प्रस्तुत खर्च हा महासंघातील कर्मचा-यांच्या वेतन व इतर प्रशासकीय बाबींवर करण्यात येणार आहे.

७. महाराष्ट्र राज्य सहकारी वस्त्रोद्योग महासंघ मर्यादित, मुंबई यांना मंजूर करण्यात आलेले अनुदान रु. ३०,००,००० (रुपये तीस लाख फक्त) एवढया रकमेचा खर्च " मागणी क्रमांक व्ही - २ अंतर्गत २४२५ - सहकार, (००) १०८, इतर सहकारी संस्थांना सहाय्य (०४) सहकारी सूत कताई गिरण्या, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना - राज्य योजनांतर्गत योजना-(०४) (०१) महाराष्ट्र राज्य सहकारी सूत गिरणी महासंघ मर्यादित, मुंबई या संस्थेस व्यवस्थापकीय अर्थसहाय्य (अनिवार्य) (२४२५ ०५९५) ३३, अर्थसहाय्य" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षासाठीच्या डिसेंबर, २०१९ अखेरपर्यंतच्या उपलब्ध तरतूदीमधून भागविण्यात यावा.

८. या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेले अर्थसहाय्य, अनुदान स्वरुपाची रक्कम महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महासंघ मर्यादित, मुंबई या संस्थेच्या खाली नमूद करण्यात आलेल्या बँक खात्यावर धनादेशाद्वारे वितरीत करण्यात यावी.

Bank Name	:	The Saraswat Co-Operative Bank Ltd.
Name of A/C	:	Maharashtra State Co-Operative Textile Federation Ltd.
IFSC	:	SRCB 0000023
A/C No.	:	023200100006223
Branch Code	:	023, Ballard Estate, Mumbai

९. महाराष्ट्र राज्य सहकारी वस्त्रोद्योग महासंघाने या आदेशाद्वारे प्राप्त होणाऱ्या अनुदान स्वरुप रक्कमेचे विनियोजन प्रमाणपत्र शासनास सादर करावे. तसेच सदरहू रक्कमेचा विनियोग महासंघातील कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करण्यासाठी करावा.

१०. सदर शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेली रु.३०,००,०००/-(रु. तीस लाख फक्त) ही रक्कम अधिदान व लेखाधिकारी, मुंबई यांच्या मार्फत कोषागारातून काढून महाराष्ट्र राज्य सहकारी वस्त्रोद्योग महासंघ मर्यादित, मुंबई (MAHARASHTRA STATE CO-OPERATIVE TEXTILE FEDERATION LTD., MUMBAI) या संस्थेला अदा करण्यासाठी श्री. र. गं. बोड्डू, कार्यासन अधिकारी (रोखशाखा), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२ यांना "आहरण व संवितरण अधिकारी" व श्री. ब. बा. चव्हाण, सहसचिव (सूतगिरणी), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ यांना "नियंत्रक अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी महासंघाला मंजूर केलेली रक्कम वितरीत करण्याची कार्यवाही करावी.

११. हा शासन निर्णय शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र.सूतगि-२००८/प्र.क्र. १७५/ टेक्स-१(ब), दिनांक २२ जून, २०१० व वित्त विभागाच्या परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१९ /प्र क्र. ९२/ अर्थ-३, दिनांक ८ जुलै, २०१९ अन्वये विभागास प्राप्त झालेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

१२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०८२७१६०९१५०६०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Prasenjeet Karlekar

Digitally signed by Prasenjeet Karlekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Operation Marketing and Textile, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d219c43caa42a6d2c11a62256b2ff3ad939a420c9fb6fa0cb24c384214bcee8c, cn=Prasenjeet Karlekar
Date: 2019.08.27 16:19:56 +05'30'

(प्रसेनजीत कारलेकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. मंत्री (वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव
२) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
३) आयुक्त, वस्त्रोद्योग आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर
४) प्रादेशिक उपआयुक्त, वस्त्रोद्योग, मुंबई
५) वित्त विभाग (व्यय-२), मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
६) नियोजन विभाग (का.१४३१), मंत्रालय, मुंबई ४०० ३२
७) महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई / महाराष्ट्र-२, नागपूर
८) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई / महाराष्ट्र-२, नागपूर
९) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
१०) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
११) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी वस्त्रोद्योग महासंघ मर्या., वकील हाऊस, दुसरा मजला, १८, श्री. शिवसागर रामगुलाम मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई - ०१.
१२) अवर सचिव -१७ सी / कक्ष अधिकारी -१६ सी / सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई ४००० ०३२.
१३) कार्यासन अधिकारी, रोखशाखा, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
१४) निवड नस्ती, टेक्स-१ (ब) / टेक्स-१ (अ).